**SUBJECT: M.A (Education) – Minutes Of the Meeting - 10 May 2018**

## एम.ए (शिक्षणशास्त्र) — विज्ञान शिक्षण पूर्नरचना बैठक इतिवृत्त

एम.ए. शिक्षणशास्त्राच्या तज्ञ सल्लागार ठरल्या प्रमाणे **विज्ञान शिक्षण** या अभ्यासक्रमाची पूर्नरचना बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठक १० मे २०१८ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेत घेण्यात आली. या बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) डॉ.विष्णू शिखरे | (सोलापूर विद्यापीठ) |
| २) डॉ.गजानन गुल्हाने | (अमरावती विद्यापीठ) |
| ३) डॉ. विजय रायबागकर | (पुणे ) |
| ४) डॉ. कविता साळुंके | (प्र. संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा) |
| ५) डॉ. विजया पाटील | (एम.ए. शिक्षणशास्त्र समन्वयक) |
| ६) डॉ. संजीवनी महाले | (शिक्षणशास्त्र विद्याशाखा) |

बैठकीच्या प्रारंभीस महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातील एम. ए. शिक्षणशास्त्र व एम.एड ह्या शिक्षणक्रमाच्या प्रचलित अभ्यासक्रमाचा आढावा घेण्यात आला. त्यावर चर्चा करून **विज्ञान शिक्षण** एक अभ्यासक्रमाचे खालील प्रमाणे निश्चिती करण्यात आली.

### विज्ञान शिक्षण

**उद्दिष्ट्ये**

१ विज्ञान शिक्षणाचे स्वरूप लक्षात घेऊन, अभ्यासक्रम,पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक परस्परसंबंध स्पष्ट करणे.
२ विज्ञान शिक्षणासाठी अध्ययन कर्त्याचे स्तर आणि संप्रेषण पद्धती स्पष्ट करणे.
३ विज्ञान शिक्षण आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या उपयोजन क्षमतेत वाढ करणे.
४ विज्ञान शिक्षणातील विविध घटकांचे मूल्यनिर्धारण आणि मूल्यमापन करण्यासाठी विविध साधने व तंत्राचे उपयोजन करणे.
५ विज्ञान शिक्षणाबाबतचे शालेय पातळीवर संशोधन करण्यास प्रवृत्त करणे.

**घटक १: विज्ञान शिक्षणाचे स्वरूप**

१.१ विज्ञानाचे स्वरूप व्याख्या गुणवैशिष्ट्ये व मर्यादा
१.२ विज्ञानामधील निरीक्षण ते विश्लेषण पद्धती
१.३ विज्ञानात गणिती आणि तर्कशास्त्रीय अधिष्ठान
१.४ विज्ञानाचे प्रायोगिक अधिष्ठान
१.५ विज्ञान पद्धतीचे टप्पे
१.६ विज्ञान अभ्यासक्रम आणि अध्यापन, अध्यापन पद्धतीत होत गेलेले बदल

**घटक २: विज्ञान संप्रेषण (वैज्ञानिक साक्षरतेचे महत्व)**

२.१ विज्ञान संप्रेषणाची आवश्यकता
२.२ विज्ञान संप्रेषणाची भूमिका
२.३ विज्ञानाची भाषा व तिचे वेगळेपण
२.४ विज्ञान संप्रेषणाचे विविध मार्ग
२.५ विज्ञान संप्रेषणासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर

**घटक ३: विज्ञान शिक्षण आणि आशययुक्त अध्यापन**

३.१ आशाययुक्त अध्ययन पद्धती संकल्पना
३.२ आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या पायऱ्या
३.३ एकात्मिक दृष्टीकोनातून विज्ञान अध्यापन
३.४ विज्ञान विषयाची संरचना

३.५ विज्ञान, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, व पाठ्यपुस्तक यांचा आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या दृष्टीकोनातून विचार
३.६ विज्ञान विषयाचे आशय आणि अध्यापन शास्त्रीय विश्लेषण
३.७ विज्ञान अध्यापनासाठी अध्यापन प्रतिमाने, पद्धती आणि तंत्राचा उपयोग
३.८ आशययुक्त अध्यापनाचे मूल्यनिर्धारण व मूल्यमापन सातत्यपूर्ण मूल्यमापनाची स्थान

**घटक ४: विज्ञान शिक्षणातील मूल्यनिर्धारण व मूल्यमापन**

४.१ विज्ञान शिक्षणातील मूल्यनिर्धारणाची उद्दिष्टे, तत्त्वे, व प्रक्रिया
४.२ मूल्यमापनाचे विविध प्रकार
४.३ विज्ञान शिक्षणातून बोधात्मक, भावात्मक, आणि कारक कौशल्याचे मूल्यमापन.
४.४ विज्ञान मूल्यमापनाची विविध साधने
४.५ विज्ञान मूल्यमापनाचे विविध नवे प्रकार

**घटक ५: विज्ञान शिक्षणातील निरंतर संशोधन आणि त्यांची उपयुक्तता**

५.१ विज्ञान शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधनाची आवश्यकता
५.२ विज्ञान शिक्षणात काळानुरूप होत गेलेले बदल
५.३ विज्ञान शिक्षणातील विविधांगी संशोधने – अध्यापन अध्ययन प्रक्रिया, माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर, प्रयोग शालेय कृती, विज्ञान बद्दलच्या संवेदना.
५.४ कृतिसंशोधन
५.५ विज्ञान शिक्षण क्षेत्रातील कार्यरत संस्था, संघटनांचे कार्य
५.६ विज्ञान शिक्षण संशोधनाच्या नव्या दिशा

या नुसार अभ्यासक्रम निश्चिती करण्यात आली त्यानंतर सर्वांचे आभार मानून बैठीकीचा समारोप करण्यात आला.

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

डॉ. विजया पाटील
समन्वयक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

School of Education * Y.C.M.O.U., Nashik *

Y.C.M. OPEN UNIVERSITY NASHIK